


# मंत्र समुपदेशनाचा

## अंक १ ला

## शनिवार दि. १ जानेवारी २०२२

महाराष्ट्रातील शिक्षक समुपदेशकांनी विद्यार्थांना मार्गदर्शन तथा समुपदेशन करण्यासाठी समर्पित केलेले एकमेव मासिक 'मंत्र समुपदेशनाचा.' शिक्षक समुपदेशकांचे लेखातील विचार हे त्यांनी स्वतः व्यक्त केलेले आहेत. सदरहू लेखांचे पुनर्मुद्रण करताना लेखकांची परवानगी घेणे अनिवार्य आहे.

## संपादक मंडळ


- सुदाम कुंभार,
  निवृत्त प्राचार्य तथा समुपदेशक
- जयवंत कुलकर्णी, शिक्षक समुपदेशक
- शरद शिंपी, शिक्षक समुपदेशक


**प्रकाशन स्थळ :**
ए/६०१ हर्षगिरी, शिवल्लभ क्रॉस रोड,
दहिसर (पूर्व) मुंबई ४०००६८
येथून प्रकाशित करण्यात आले.
संपर्क : 9833414992

या मासिकासाठी समुपदेशक तथा लेखक म्हणून आपण स्वेच्छेने आपले योगदान देऊ इच्छित असाल तर विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम किंवा समुपदेशन यावर आधारित किंवा आपले समुपदेशन, मार्गदर्शनपर शाळेत राबविलेले उपक्रम आणि अध्ययनाचे अनुभव यावर आधारित किमान ६००/७०० शब्दांपर्यंतचे लेख पुढील मेलवर प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी careerinfoskjk2022@gmail.com पाठवावेत.

विशेष आभार : सर्व चित्रमय शैक्षणिक संदेश डॉ. उमेश दे. प्रधान



डॉ. उमेश दे. प्रधान,
निवृत्त मुख्याध्यापक आणि माजी निमंत्रक,
इंग्रजी विषय अभ्यास मंडळ, राज्य मंडळ.

सध्याचा काळ धकाधकीचा, ताणतणावाचा, समस्यांचा, चिंतांचा, अडचणींचा झाला आहे. माणुस स्वास्थ हरवून बसला आहे. प्रत्येक क्षेत्रातील स्पर्धा जिवघेण्या झाल्या आहेत. सभोवताली प्रश्नांचे जंगल पसरले आहे. परिणामतः मनःशांती हरवून बसलेले अनेक जण. आपण चुकत आहोत असे न वाटता दूसरा कसा चुकीचा आहे हे पटविण्यात सगळे मग्न. विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच झालेला चंगळवादाचा वाढता प्रभाव, गरजेपेक्षा हव्यासाची लागलेली ओढ हे सगळे याला कारणीभूत आहे. वाढती लोकसंख्या हे या कारणाच्या मुळाशी.

अशा या गढूळ वातावरणात प्रत्येकजण तावून सुलाखुन निघतो आहे. यात आहेत मुलं, त्यांचे पालक, शिक्षक, मुख्याध्यापक अगदी कुणीही. माणसाला लागले चिंतेचे मोहोळ कमी होता होत नाहीए. उलट ते दिवसेंदिवस उग्र स्वरुपच धारण करु लागले आहे. यातून बाहेर पडायचा मार्ग प्रत्येकजण आपआपल्या परीने शोधतो आहे. उत्तरे कुणाकडे आहेत? समस्यांमधून बाहेर पडण्याचे मार्ग कुणाकडे आहेत? दिशा कुणी दाखवू शकतयं का? स्वतःच्या मनामधील शंका सांगायची लाज वाटते, कुणाकडे जावे? परत प्रश्न आणि प्रश्नच.

कोणता अभ्यासक्रम निवडावा? त्याची माहिती कुठे मिळेल? व्यवसाय करावा का नोकरी शोधावी? अशा अनेक प्रश्नांनी मन ग्रासून जातं आणि ते अनुत्तरीतच रहातात. मला योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले असते ना, तर मी सुध्दा अगदी आय. ए. अस. अधिकारी नक्की झालो असतो. आमच्या वेळेस असे सांगणारे कुणी नव्हते. या सगळ्यावरची उत्तरे आता सोपी होणार आहेत. प्रश्नांना समर्पक उत्तरे मिळणार आहेत. श्री. सुदाम कुंभार आणि त्यांचे सर्व सहकारी हे काम सोपे, सहज करणार आहेत. अनेक वर्षांचा अनुभव आणि अभ्यासूवृत्ती यातून मीळणारी माहिती ही नक्कीच उपयुक्त ठरणार आहे. वाचकांच्या सक्रिय प्रतिक्रियांमधून हे शक्य होणार आहे. अशा मार्गदर्शनाची खरी गरज सर्वांनी ओळखली आहे. त्यामुळे या मासीकाचे नक्कीच सहर्ष स्वागत करायला हवे. समुपदेशनाच्या या कार्याला माझ्या मनापासून शुभेच्छा.





महेंद्र गणपुले,
राज्य प्रवक्ता, मुख्याध्यापक महामंडळ
मुख्याध्यापक,
गुरुवर्य  एकनाथ गोविंद देव प्रशाला, बोरी खुर्द,
तालुका जुन्नर, जिल्हा पुणे.

शिक्षण आणि नोकरी यांच्यातील संबंध लक्षात आल्याने आणि त्यातील मर्यादित संधी असल्याने आता अनेक जण व्यवसायाकडे वळत आहेत. अशावेळी व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची विश्वासार्ह माहिती आणि योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी मंत्र समुपदेशनाचा हे ऑनलाईन मासिक आपण सुरु करत आहात हे ऐकून आनंद वाटला .

काळाची गरज ओळखून आपण करत असलेल्या अनमोल मार्गदर्शनामुळे आवड, क्षमता आणि संधी याचे योग्य परीक्षण करून  नव्या पिढीने आपले भविष्य उज्वल करण्यास हाती घेतलेल्या उपक्रमासाठी मनापासून शुभेच्छा !!





संजय पाटील,
प्राचार्य, विद्याभूषण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ,
दहिसर पूर्व , मुंबई ४०० ०६८

मंत्र समुपदेशनाचा हे व्यवसाय मार्गदर्शन करणारे ऑनलाईन मासिक सुरू करीत असल्याचे कळले व आंनद वाटला.

विद्यार्थ्यांप्रती असलेली आपली तळमळ पुन्हा प्रकर्षाने जाणवली. जवळपास २ वर्षे विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. त्यांची लेखन वाचनाची आवड कमी झाल्याचे जाणवत आहे. लेखन व वाचनाचा वेगही मंदावल्याचे जाणवत आहे. अशा प्रसंगी त्यांना प्रोत्साहन, समुपदेशन व १० वी १२ वी नन्तर पुढे काय? याचे मार्गदर्शन होणे खूपच गरजेचे आहे. आपण ते आपल्या ऑनलाईन मासिकातून सुरू करीत आहात व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समुपदेशन करीत आहात त्यामुळे आपणास आपल्या स्तुत्य उपक्रमाबद्दल खूप खूप शुभेच्छा.

श्री सुदाम कुंभार, सर नेहमीच आपल्या व्याख्यानातून किंवा आपल्या लेखणीतून विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम करीत आलेले आहेत. त्यांच्या कार्याची उत्कृष्ट पद्धती सर्वांना ज्ञात आहे.

या उपक्रमात सरांच्या अनुभवाचा चांगला फायदा विद्यार्थ्यांना होईल याची खात्री आहेच.

आपल्या या सामाजिक उपक्रमास अनेक शुभेच्छा !!



## मंत्र समुपदेशनाचा

नमस्कार,

सर्व संस्थाचालक, शाळा प्रमुख, शाळांमधील शिक्षक-समुपदेशक, पालक आणि विद्यार्थी मित्रांनो मंत्र समुपदेशनाचा हा विविध व्यवसायभिमुख अभ्यासक्रमांच्या माहितीचा खजिना आणि समुपदेशनाचे विविध मंत्र आपल्या हाती सुपूर्द करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. कोरोना मुळे जवळजवळ १९ महिन्यांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आपली शाळा नुकतीच सुरू झालेली आहे. एवढ्या मोठ्या दीर्घ कालावधीनंतर शाळेत जाणं, त्या परिसराशी स्वतःला सुसमायोजित करणं हे तुमच्यासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक आव्हान असू शकतं, पण आपले सहकारी, मित्र आणि मैत्रिणी यांना पाहून तो कठीण प्रसंग आपण नक्कीच विसरलेला आहात. मंत्र समुपदेशनाचा या मासिकाच्या माध्यमातून आम्ही खूप मोठ्या उत्साहाने आपणास मार्गदर्शन करण्यासाठी सज्ज झालेलो आहोत. यामध्ये दहावी, बारावी आणि उच्च शिक्षणानंतर आपण कोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम निवडू शकता याची सखोल माहिती आमचे समुपदेशक आपणास करणार आहे. यामध्ये महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत असलेले समुपदेशक, तुम्हाला समुपदेशन तसेच मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या संपर्क क्रमांका सहित आपल्यासाठी उपलब्ध असतील. आम्हाला खात्री आहे आपण नक्कीच या सुवर्ण संधीचा फायदा घेण्यासाठी सज्ज आहात.

**सुदाम कुंभार,**

**संपादक**

# १४ जानेवारी मकर संक्रांती

# व्यवसाय मार्गदर्शन दिन

एखादा विशिष्ट 'दिन' साजरा करणे म्हणजे त्या दिवशी घडलेली घटना, प्रसंग, व्यक्तीविशेष इत्यादी समुहमनाच्या स्मृतिपटलावर आणणे होय इतकचं. नाही तर तो दिन साजरा करून त्याचे महत्त्व व उपयुक्तता अनेक अंगांनी कशी फायदेशीर म्हणून अनुकरणीय हे प्रत्येक वेळा विषद करता येतं. राष्ट्रपुरुषांच्या, समाजसुधारकांच्या, वैज्ञानिक संशोधकांच्या, संतांच्या जयंती अथवा पुण्यतिथी साजऱ्या करण्यामागिल हेतू व उद्देशांचा विचार केलाच तर तो दिवस साजरा करणं खूपच महत्त्वाचे का आहे हे जाणवते, पटते व लक्षातही येते.

आजपर्यंतच्या कालखंडाचा विचार करता असे लक्षात येते की प्रत्येक वेळा विशिष्ट कालखंड हा एका वैचारिक प्रेरणेने भारावलेला व म्हणूनच त्या विचारांचा प्रसार व प्रचार मनामनात होऊन समाजमनाच्या हृदयस्थानी विराजमान व्हावा इतका तो प्रखर, जाज्वल्य आणि जोरकस असतो. या सर्वांचा प्रत्यय आपणास इतिहास, राजकारण, समाजकारण अथवा शिक्षण इत्यादी सर्वच क्षेत्रात पाहता येईल. स्वातंत्र्यपूर्व कालखंड स्वातंत्र्य चळवळींनी भारावलेला होता. म्हणूनच भारतीय स्वातंत्र्य दिन प्रत्येक देशवासियांसाठी प्रेरणादायी व अविस्मरणीय असा प्रत्येकाला वाटतो. अशी विविध क्षेत्रातील वेगवेगळ्या स्तरावरील अनेक उदाहरणे देता येतील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, विभागीय कार्यालय मुंबई-४००००१ हे त्यातीलच एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई या संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात विशेष करून माध्यमिक विभागातील शिक्षकांसाठी व्यवसाय मार्गदर्शन प्रशिक्षण व विद्यार्थ्यांचे समुपदेशन तथा मार्गदर्शन करून अतिशय मोलाची कामगिरी केलेली आहे.

**ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणे । जीवलग नेणें मज कोणी ।** अशा उदासीन, विपरीत व विचित्र अवस्थेत सापडलेल्या विद्यार्थी व पालकांना वाट दाखवण्याचे व दिशा देण्याचे, मार्गस्थ आणि आश्वस्त करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या संस्थेच्या माध्यमातून अर्ध्या अधिक शतकाहून सुरू आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. म्हणूनच या संस्थेचा बोलबाला, गवगवा, कीर्ती व गौरवकार्य सर्वांपर्यंत महाराष्ट्रभर पोहोचवावे व स्मरणात राहावे यासाठी दरवर्षी **१४ जानेवारी मकर संक्रांती** हा दिवस **व्यवसाय मार्गदर्शन दिन** म्हणून साजरा केला जातो.

संक्रमण म्हणजे भौगोलिक दृष्ट्या  सूर्याचा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश  होय. अर्थात गमन गती व प्रवास असाही अर्थ होतो. तसाच अवस्थांतर हा एक अर्थ त्या शब्दाचा आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी ज्याप्रमाणे सूर्याचे राश्यांतर  होते त्याचप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थ्यांचा जो शैक्षणिक प्रवास होणार आहे त्या दृष्टीने तो प्रत्येक विद्यार्थी व व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था आणि शिक्षक-समुपदेशकाच्या माध्यमातून जर एकमेकास जोडलेले , बांधील असतील तर त्या विद्यार्थ्यांचे भावी आयुष्यातील संक्रमण अतिशय सुखावह आणि समाधानकारक म्हणून यशस्वी व्हावे तरच त्या सर्वांचे अवस्थांतर नैसर्गिक आणि विनासायास होईल. आणि ज्या विद्यार्थ्यांनी या संस्थेच्या व समुपदेशकांच्या संपर्कात राहून मार्गदर्शन घेतले त्यांचे आयुष्य उजळलेले, प्रकाशीत झालेले आहे हा अगणित विद्यार्थ्यांचा अनुभव आहे. त्या दृष्टीने विचार करता संस्थेचे महत्त्व, उद्देश, योजना आणि कार्य विद्यार्थ्यांना, पालकांना किंबहुना सर्व समाजास कळावे आणि त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक आयुष्य बहरत, फुलत, वाढत रहावे यासाठी या संस्थेने व पर्यायाने व्यवसाय मार्गदर्शन करणारे शिक्षक समुपदेशकांच्या संपर्काचे, माहितीचे, समुपदेशनाचे महत्त्व दृढ होण्यासाठी व्यवसाय मारगदर्शन व निवड संस्था व मार्गदर्शन/ समुपदेशन या संदर्भातील उपयोगिता वाढावी तथा स्मरावी  या **उद्देशानेच १४ जानेवारी हा दिवस व्यवसाय मार्गदर्शन दिन** म्हणून साजरा केला जातो.  आजमितीस संस्था  व तिचेकार्य याबद्दल समाजमनात आदराचे स्थान आहे ते संस्थेच्या बहुविध उद्दिष्टांमुळे व शिक्षक समुपदेशकांच्या झपाटल्यागत काम केल्यामुळेच आहे.  **कमोदिनी  काय जाणे तो परिमळ ।  भ्रमर सकळ भोगितसे ।**  या तुकोक्तिप्रमाणे महाराष्ट्रातील पालक व विद्यार्थी यांची संख्या अंकात सांगणे कठीण आहे ते सर्व विद्यार्थी भ्रमरासारखे संस्थेच्या शिक्षक समुपदेशकांच्या माध्यमातून माहिती व ज्ञानरुपी मकरंदाचा आस्वाद अखंड घेत आहेत. जसजसा एक एक वर्षाने काळ पुढे जातो तसा व्यवसाय  मार्गदर्शन दिन साजरा होतो आणि या  संस्थेच्या कार्याचा परिमळ इतका दरवळत असतो की  आपसूकच विद्यार्थी व पालक त्याकडे नकळत चालत येतात. समुपदेशकांनी केलेल्या परिश्रमाचा आलेख म्हणजे व्यवसाय मार्गदर्शन दिन होय. या एकंदरीत प्रकरणात **हाकारोनि सांगे तुका ।  नाम घेता राहू नका ।** असा प्रत्यय येतो.

आजच्या तारखेला जरी संस्थेच्या माध्यमातून समुपदेशक प्रशिक्षणाचे (मुंबई येथील) कार्य बंद झाले असले तरी समुपदेशकांच्या समन्वयातून विद्यार्थी व पालकांसाठी व्यवसाय मार्गदर्शनाचा घोष अखंड सुरूच आहे. यापुढील काळातही तो असाच सुरू राहणार हे मात्र नक्कीच.

**शरद शिंपी**

**सह संपादक**

# अंतरंग


| अ. क्र | लेख | लेखक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक अभ्यासक्रम - प्रोफेशनल आणि व्होकेशनल | सुदाम कुंभार |
| २. | मंत्र समुपदेशनाचा | शरद शिंपी |
| ३. | अनुभव समुपदेशनाचे | नीता सु. सावंत |
| ४ . | सावधान ऐका त्यांच्या हाका | पी. एम. काळे |
| ५ . | हवे नियोजन यशाचे | अविनाश कुलकर्णी |
| ६ . | मानसशास्त्रीय चाचण्या : करियर निवडीतील दिशादर्शक | जयवंत कुलकर्णी |
| ७. | करिअर निवड प्रक्रियेत मानसशास्त्रीय चाचणी व समुपदेशनाचे महत्व | विश्राम सूर्यवंशी |
| ८. | समुपदेशकाची कर्तव्ये (संकलित ) | पी. एस. गुरव |


*(अंकातील लेखकांनी मते स्वतंत्र असून त्यांनी व्यक्त केलेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)*



सुदाम कुंभार
संपादक,
9833414992

## व्यावसायिक अभ्यासक्रम - प्रोफेशनल आणि व्होकेशनल

माध्यमिक शालांत परीक्षा (इ. १० वी), उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १२ वी ) किंवा पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुद्धा आपण जेव्हा काही अभ्यासक्रमांच्या जाहिराती अथवा माहिती पाहात असतो तेव्हा आपल्याला प्रोफेशनल आणि व्होकेशनल असे अभ्यासक्रम पाहायला मिळतात. या दोन्ही अभ्यासक्रमांमधला फरक नक्की काय आहे ते आपण आज जाणून घेऊ या.

प्रोफेशनल अभ्यासक्रम आणि व्होकेशनल अभ्यासक्रम हे दोन्ही अभ्यासक्रम व्यवसायांशी संबंधितच आहेत. प्रोफेशन आणि वोकेशन या दोन्हीचा अर्थ व्यवसाय असाच होतो. परंतु प्रोफेशनल व्यवसायासाठी शिक्षण तसेच उच्च प्रशिक्षणाची आवश्यकता असते आणि वोकेशनल अभ्यासक्रमासाठी स्वतःचं आयुष्य जगण्यासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी अथवा उपजीविकेचे साधन म्हणून निवडलेला व्यवसाय व त्यासाठी घेतलेलं योग्य प्रशिक्षण होय.

### प्रोफेशनल अभ्यासक्रम :

- या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परीक्षा, माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत परीक्षा किंवा पदवी परीक्षेतील गुण आणि प्रामुख्याने सामाईक परीक्षेतील गुण प्रवेशासाठी विचारात घेतले जातात.
- प्रवेश परीक्षांसाठी सखोल अभ्यास करणे अनिवार्य.
- विशिष्ट अभ्यासक्रमांवर आधारित राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर प्रवेश परीक्षेचे आयोजन केले जाते.
- संपूर्ण प्रवेश प्रक्रिएचे आयोजन शासकीय किंवा त्या-त्या आस्थापने द्वारे केले जाते.
- अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण कालावधी ३ किंवा ४ वर्षांचा आणि काही महिन्यांची आंतर्वासिता.
- पदविका/पदवी प्रमाणपत्र दिले जाते.
- गुणवत्ते नुसर नोकरीची हमी.

**संपूर्ण भारतात प्रत्येक राज्यातील विद्यापीठे, स्वायत्त संस्था तसेच शासकीय संस्था यांच्या राज्यस्तरावर किंवा राष्ट्रीय स्तरावर जवळजवळ १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक तथा नियमित अभ्यासक्रमांसाठी प्रतिवर्षी समाईक परीक्षांचे आयोजन करण्यात येते. माहितीसाठी काही उदाहरणे.**

१) नॅशनल रेल अँड ट्रांसपोर्टेशन इन्स्टिट्यूट : [https://www.nrti.edu.in](https://www.nrti.edu.in)
बीबीए ट्रांसपोर्टेशन मॅनेजमेंट, (कोणत्याही विद्याशाखेतून १२ वी गणित विषयासह उत्तीर्ण)

बी.एससी ट्रांसपोर्टेशन टेक्नॉलॉजी, (१२ वी विज्ञान उत्तीर्ण)

बीटेक रेल इन्फ्रास्ट्रक्चर इंजीनियरिंग, (१२ वी विज्ञान उत्तीर्ण)

बीटेक सिस्टम अँड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग इ. (१२ वी विज्ञान उत्तीर्ण)

२) राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्तेनुसार मुंबई विद्यापीठ आयोजित कॉमन मॅनेजमेंट एन्ट्रन्स टेस्ट (एमयुसीएमइटी) बीएमए आणि एमबीए या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सामाईक प्रवेश परीक्षा. [https://mu.ac.in](https://mu.ac.in)

३) जेइइ, नीट, नाटा (आर्किटेक्चर), फाईनआर्ट पदवी अभ्यासक्रम, हॉटेल मॅनेजमेंट, कॉमन लॉ ॲडमिशन टेस्ट, बीएड, बीपीएड, एमएड, कृषी पदवी अभ्यासक्रमासाठीचे प्रवेश, औषध निर्माण शास्त्र पदवी अभ्यासक्रम, आयआयएम व्यवस्थापनातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी (आमदाबाद इंदोर, बेंगलुरु, कोझिकोडे, रोहतक, कोलकाटा आणि मुंबई), एनडीए, आयआयटी इ.

४) प्रोफेशनल अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षासाठी संकेतस्थळे–

- राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष महाराष्ट्र राज्य (महाराष्ट्र राज्यातील सर्व व्यावसाईक अभ्यासक्रम) : *https://cetcell.mahacet.org*
- वैद्यकीय अभ्यासक्रम : [*https://neet.nta.nic.in*](https://neet.nta.nic.in) [*https://www.aiimsexams.ac.in*](https://www.aiimsexams.ac.in) / *https://jipmer.edu.in*
- जेईई (आय आय टी मधील अभियांत्रिकी प्रवेश) : *https://jeemain.nta.nic.in*
- एन डी ए (डिफेन्स सर्विसेस) : *https://www.upsc.gov.in*
- नाटा (आर्किटेक्चर) : [*https://www.nata.in*](https://www.nata.in)
- सी एल ए टी (कायद्याचा अभ्यास) : [*https://consortiumofnlus.ac.in*](https://consortiumofnlus.ac.in)

प्रोफेशनल अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची सविस्तर माहिती, त्यासाठी संपूर्ण देशात आयोजित करण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा, संबंधित महाविद्यालय यासाठी [https://mahacareerportal.com](https://mahacareerportal.com) या संकेतस्थळावरून माहिती घ्यावी.

**व्होकेशनल अभ्यासक्रम :**

- शिक्षण ८ वी ते १० वी, १०+२ उत्तीर्ण किवा पदवी
- काही अभ्यासक्रमांसाठी सामाईक प्रवेश परीक्षा
- प्रशिक्षणाचा कालावधी एक महिना ते एक/दोन/तीन वर्षे.
- प्रशिक्षण प्रमाणपत्र मिळते.
- छोट मोठे उद्योग तथा गुणवत्तेनुसार खाजगी/शासकिय क्षेत्रात नोकरीची संधी.

- कुशल कारागीर बणण्याची संधी तसेच स्वतःचा व्यवसाय करू शकता.

**संपूर्ण भारतात प्रत्येक राज्यातील विविध संस्था तसेच शासकीय संस्था यांच्या राज्यस्तरावर किंवा राष्ट्रीय स्तरावर जवळजवळ ३० पेक्षा अधिक व्यावसायिक तथा नियमित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी तसेच काही अभ्यासक्रमांसाठी प्रतिवर्षी समाईक परीक्षांचे आयोजन करण्यात येते.**

१) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी)

या संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी सहा महिने कालावधीचे, सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीचे तसेच दोन वर्षांचे पदविका अभ्यासक्रम इत्यादीसाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जातील माहितीनुसार, गुणवत्तेनुसार तसेच मुलाखतीतील प्राप्त गुणांनुसार इच्छुक अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येतो. संस्थेतील सर्व प्रकारचे अभ्यासक्रम, शैक्षणिक पात्रता, परीक्षा तथा मुलाखत पद्धती, प्रत्येक अभ्यासक्रमासाठी एकूण उपलब्ध प्रवेश क्षमता, परीक्षा शुल्क, अर्ज करण्याची पद्धती इत्यादीसाठी या संकेतस्थळावरून https://nift.ac.in/cep अधिक माहिती घ्यावी.

२) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे आयोजित बीए - जेम्स अँड ज्वेलरी ३ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून एकूण ५० जागांसाठी निवड केली जाते. संपूर्ण अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती, परीक्षा शुल्क, अर्ज करण्याची पद्धत इत्यादीसाठी या संकेतस्थळावरून माहिती घ्यावी-

*https://campus.unipune.ac.in/CCEP/Documents2021/SPPU_IIGJ%20advertisement_Final.pdf*

३) **वरील प्रमाणे कमी कालावधी तसेच तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम असलेले इतर अभ्यासक्रम** : बँकिंग फायनान्शिअल सर्विसेस अँड इन्शुरन्स, ब्युटी अँड वेलनेस, कन्स्ट्रक्शन, डिफेन्स सिक्युरिटी अँड गव्हर्मेंट सर्विसेस, अर्ली चाईल्डहूड अँड प्रायमरी एज्युकेशन, इलेक्ट्रॉनिक अँड हार्डवेअर, इंजीनियरिंग अँड टेक्निकल, हेल्थकेअर सपोर्ट सर्विसेस, हॉस्पिटॅलिटी ऍण्ड टुरिझम सर्विसेस, मेडिया अँड एंटरटेनमेंट, सेल्स आणि मार्केटिंग ऑपरेशन्स, स्पोर्ट्स अँड फिटनेस, टेक्स्टाईल अँड हॅण्डलूम इत्यादी. प्रोफेशनल अभ्यासक्रमांच्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती त्यासाठी संपूर्ण देशात आयोजित करण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा संबंधित महाविद्यालय यासाठी *https://mahacareerportal.com* या संकेतस्थळावरून माहिती घ्यावी.

विद्यार्थ मित्रानो कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी स्वतःच्या क्षमता ओळखा. कोणताही अभ्यासक्रम स्वतःच्या पसंतीने निवडा. मित्र अथवा मैत्रिणीने निवडलेला अभ्यासक्रम हा त्याच्या किंवा तिच्या पसंतीचा असतो म्हणून मित्राची अथवा मैत्रिणीची पसंती ही स्वतःची निवड समजू नका. अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी विचारात घेऊन त्यानुसार पुढील नियोजन करा. कोणताही अभ्यासक्रम निवडल्यास प्रत्येक ठिकाणी सातत्यपूर्ण अभ्यास आहेच हे लक्षात ठेवा. कोणताही व्यावसायिक अभ्यासक्रम निवडताना स्वतःच्या कामातील गती आणि अचूकता याचा अंदाज घ्या. स्वतःचा भाषिक क्षमतांचा विकास करण्याच्या दृष्टीने सदैव प्रयत्नशील राहा.



शरद शिंपी, सहसंपादक,
आयइएस न्यू इंग्लिश स्कूल वांद्रे (पूर्व) मुंबई
9820782097

## मंत्र समुपदेशनाचा

**"अधिकार तैसा करू उपदेश। साहें ओझें त्यास तें चि द्यावें"**

अधिकार म्हणजे गुण, कौशल्ये, क्षमता, अभिवृत्ती किंवा अभिरूची. उपदेश अर्थात सांगणे, समजावणे मार्गदर्शन करणे. ज्याच्या व्यक्तिमत्त्वात ज्या विशेष बाबी नैसर्गिकत: आहेत त्याच त्याला करण्यासाठी समजावणे , त्यासाठी आश्वस्त व मार्गस्थ करणे होय. तुकोबांनी उपदेश करतांना काय दक्षता घ्यावी याचा सुंदर वस्तूपाठ या अभंगचरणात दिलेला आहे.

मंत्र या शब्दाचा अर्थ ' इष्टसाधक आणि अनिष्ट निवारक' असा आहे. तसाच ' एखादी गुह्य गोष्ट प्राप्त करून घेण्यासाठी, त्या मार्गातील अनिष्ट असलेल्या गोष्टींचे निवारण करणारा जो वर्णसमूह अर्थात विचार तो म्हणजे मंत्र होय.'

समुपदेशन ही समुपदेश्य व समुपदेशक या दोघांत होणारी एक मानसशास्त्रीय प्रक्रीया आहे. यात लाभार्थी (विद्यार्थी) व समुपदेशक या दोघांतही अत्यंत मैत्रीपूर्ण, समपातळीवर व समाधानकारक वातावरणात चर्चा होणे, समस्या असल्यास त्यांचे स्वरूप ठरविणे, जाणून घेणे व पुढील सल्ला, मार्गदर्शन करणे व आवश्यकता असल्यास उपचार सांगणे, ती समस्या सोडण्यासाठी, सोडविण्याचा प्रयत्न करण्याचा विचार करण्यासाठी प्रवृत्त करणे, मदत करणे असा अर्थ अभिप्रेत आहे. खरंतर समुपदेशनासाठी लाभार्थ्यांस काही एक समस्या असलीच पाहिजे असे काहीही नसते. उलट अभ्यासात, वर्तनात आणि सामाजिक जीवनात काही समस्याच निर्माण होऊ नयेत म्हणून विद्यार्थी व पालकांनी सुद्धा योग्य प्रशिक्षित समुपदेशकांकडूनच (बाजारू नाही) समुपदेशन करून घेणे जरूरीचे म्हणुनच आवश्यक वाटते. व. पु. काळे म्हणतात त्याप्रमाणे आपण सारेच अर्जुन आहोत, हे मान्य केल्यास आपल्याला मार्गदर्शन करणारा श्रीकृष्ण हवाच. अन्यथा आपला हॅम्लेट होऊ शकतो. किंबहुना अफाट ताकद, बुद्धिमत्ता व पराक्रमी असताना सुद्धा निव्वळ शंका आणि ती निवारण करणारा योग्य मार्गदर्शक यांच्या अभावामूळे भ्रमिष्ट होणे अटळ झाले. अशी समाजातील अनेक उदाहरणे आपण दैनंदिन जीवनात पाहत असतोच. शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, व्यावसायिक जीवन, इत्यादी टप्प्यांवर समुपदेशन तसे आवश्यक म्हणुन जरूरीचे वाटते.

मंत्र समुपदेशनाचा या शीर्षकाने, नव्या वर्षात प्रकाशित होणारे समुपदेशनावरील मासिक बहुदा समुपदेशक - शिक्षकांनी सुरू केलेले पहिलेच मासिक असावे. आणि आजच्या कोव्हीड - 19 या जागतिक साथरोग आजाराच्या पार्श्वभूमीवर ते अत्यंत उपयुक्त व गरजेचे सिद्ध होईल असा ठाम विश्वास वाटतो. मंत्र समुपदेशनाचा हे मासिक म्हणजे समुपदेशनातील विविध पैलूंवर भाष्य करणारे, अनुभवी समुपदेशक - शिक्षकांचे बोल आहेत. समस्त विद्यार्थी, पालक किंबहुना शिक्षक व समुपदेशकांसाठी वाहिलेले हे मासिक व त्याची संकल्पना मुळांत नितांत सुंदर, आवश्यक, महत्त्वपूर्ण, गरजेची , भविष्याचा वेध घेणारी , अनेक अभ्यासपूर्ण लेख, माहिती, ज्ञान, मंत्र व तंत्रांनी समाविष्ट असलेले आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना विशेषतः ग्रामीण व मराठी माध्यमातील विद्यार्थी व सर्व माध्यमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या

पालकांसाठी अतिशय उपयुक्त असे असणार आहे. या मासिकातून, दर महिन्याला विद्यार्थ्यांना, पालकांना शैक्षणिक, व्यावसायिक अभ्यासक्रम, त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या विविध प्रवेश परीक्षा, तो तो अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शासकीय, खाजगी, संस्था महाविद्यालये, विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे इत्यादी इत्यादींविषयी सविस्तर माहिती मिळणार आहे. त्याच्यासोबत त्या सर्वांचे संकेतस्थळ, ( वेबसाईट) दूरभाष क्रमांक (मोबाईल / दूरध्वनी क्रमांक) या सर्वांबाबत अचूक व खात्रीशीर माहितीचा स्त्रोत उपलब्ध होणार आहे. म्हणजे देश विदेशातील शिक्षण, अभ्यासक्रम, व्यवसाय, त्यातील संधी याबद्दलचे ज्ञान मिळविणे त्याची गरज लक्षात येणे, महत्त्व जाणून घेणे व भविष्यावर नजर ठेवणे अर्थातच करिअरचे गमभन जाणून घेणे शक्य होईल.

मासिकाच्या शीर्षकातच त्याची उपयुक्तता व यशस्वीता सामावलेली आहे. जे इष्टसाधक म्हणजे प्राप्त करायचे आहे ; व अनिष्टनिवारक अर्थात आपल्या ध्येयाच्या वाटेवर चालतांना नको असलेले सर्वकाही दूर सारावयाचे आहे असा जो वर्णसमूह अर्थात विचार म्हणजे 'मंत्र' होय. आवश्यक ते शैक्षणिक, व्यावसायिक यश, समाधान प्राप्त करण्यासाठी त्या - त्या विद्यार्थ्याच्या अंगी काय व कोणते गुण-कौशल्ये, अभिवृत्ती, अभिरुची इत्यादी असावेत हे एक समुपदेशक उत्तमरीत्या जाणतो. तो समुपदेशक 'शिक्षक' असेल तर त्याचा आपल्या अध्यापन क्षेत्रातील अभ्यास, व्यासंग व निरीक्षण याबळांवर त्याने / तिने विद्यार्थ्यांच्या हिताची, खात्रीशीर विशिष्ट मंत्रावली तयार केलेली असते. जेंव्हा तो प्रत्येक विद्यार्थी व पालक अशा शिक्षक समुपदेशकांस भेटत राहील तेंव्हा तेंव्हा त्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या भावी आयुष्याचा योग्य मार्ग निवडण्याचे बळ प्राप्त होईल.आणि ही फक्त शक्यता नसून आम्हा सर्वांचा अनेक वर्षापासुनचा अनुभव सुद्धा आहे. असे होते तेंव्हा मग डोळा अंजन भेटें असे माउली ज्ञानेश्वर म्हणतात ती दृष्टी फाकण्याची स्थिती म्हणजे समुपदेशन होय.

**मज हृदयी सद्गुरु । जेणे तारीलों हा संसारपूरु । म्हणोनि विशेषे अति आदरु । विवेकावरी ॥ ज्ञाने. ॥**


सारासार विचार म्हणजे विवेक. विवेक हा दृष्टी व दृष्टिकोन या दोघांनाही जन्मास घालतो. विवेक ज्यांच्या मूळे प्राप्त होतो त्यांना अध्यात्मात 'सद्गुरु' म्हणून संबोधतात, तर समुपदेशनात त्यास **समुपदेशक** तसं पाहता दोघांचीही भूमिका सारखीच आहे. तार्किक विचार करायला शिकविणे, कार्यकारण भाव शोधण्यास मदत करणे, वैज्ञानिक दृष्टीकोनातून विचार करायला शिकविणे म्हणजेच सत्य, वास्तव व मूर्त जे आहे ते जाणून घेणे होय. हा विचार देणारा समुपदेशक काळाची गरज आहे. हीच विवेकाची संकल्पना आहे. विभूतीपेक्षा विचार महत्वाचे असतात हे सांगणे आज आवश्यक आहे. अन्यथा आपल्या समाजाला आजही व्यक्तिपूजा महत्वाची वाटते. त्यांना वाटायचे ते वाटो.

एकदा वास्तवता व वास्तविकता या दोघांचेही आकलन झाले व लाभार्थ्यांने ते मान्य केले तर समुपदेशकाकडे असलेले मंत्र व त्यांची सिद्धता होण्यासाठीचे तंत्र यांच्या योग्य समन्वयातून त्या - त्या लाभार्थ्यांना **निश्चितच** सुख व समाधान अर्थात योग्य दिशा व वळण मिळते.

**बुडतां हे जन न देखवें डोळां । येतो कळवळा म्हणउनि ॥ (तु. गा. 948)** अज्ञान व अंधश्रध्दा यामुळे समाजाचे होणारे अध: पतन, शोषणास कारणीभूत ठरते त्यातून अन्याय होतो आणि सामान्य जीव रसातळाला जातात हे पाहून लोकशिक्षक, थोर विचारवंत विश्वविख्यात मराठी कवी, जगद्गुरू तुकोबा नेहमी अस्वस्थ असत आणि समाजाला नेमकी, आदर्श जीवन जगण्याची रीत सांगण्यासाठी ते रात्रींदीन युद्धाचा प्रसंग असावा तसे झटत होते. अगदी ओह कॅप्टन माय कॅप्टन सारखे. आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी तोच आणि तसाच विचार एका शिक्षकाला, समुपदेशकाला सतत खंतावत आणि चिंतावत असतो. **तळमळी चित्त घातले**

**खापरीं । फुटतसे परि लाहीचिया ॥** या तुकोक्तीनुसार शिक्षक - समुपदेशक सतत विद्यार्थीहितासाठी नवनविन पर्याय, साधने शोधत असतात.

विद्यार्थीविकास हा कुटुंब व समाजाच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. म्हणून साने गुरुजी म्हणतात तसा, ' बलसागर भारत होओ, विश्वात शोभूनी राहो.' असं खरं ठरण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मंत्र समुपदेशनाचा देणे महत्वाचे वाटते. या मासिकाच्या माध्यामातून तो साध्य होत आहे तेंव्हा त्यासाठी सर्व विद्यार्थी व पालक यांनी त्याचा लाभ घ्यावा अशी अपेक्षा. आणि संपादक मंडळ व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांना मनःपूर्वक शुभेच्छा.




*शाळा कशी आहे, तिथले व्यवहार, शिकवणं, शिस्त, या सर्वांची कल्पना केवळ शाळेच्या प्रवेशद्वाराकडे पाहिल्यावरच समजून येते. प्रवेशद्वारावरचे वातावरण अनेक गोष्टींची कल्पना देते. प्रत्येक शाळेची एक संस्कृती असते त्याची जाणीव ही सुरुवातीलाच घडते. मुलांचे, पालकांचे, शिक्षकांचे वावरणे लगेचच आतील वातावरण कसे असेल याची जाणीव निर्माण करून देणारे असते. एक कटाकक्षात शाळेची प्रसन्नता, अभ्यासू वातावरण, स्वच्छता, खेळ या सर्वांची जाणीव निर्माण होते.*

*डॉ. उमेश दे. प्रधान*



सौ. नीता सूर्यकांत सावंत.
श्री गोविंद बलमंदिर माध्यमिक विद्यालय अंधेरी (पूर्व)
मुंबई ४०० ०६९
9870088915

# अनुभव समुपदेशनाचे.

व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई येथे १९९९-०० मध्ये करियर मास्टर हा कोर्स पूर्ण केला. आपल्याच शहरात हा कोर्स करायला मिळतोय, नवीन काही शिकता येईल असं मनात आणून पूर्ण केलेला हा कोर्स आपल्या जीवनात नवीन आनंद आणणारा ठरेल अशी पुसटशी कल्पना हा कोर्स पूर्ण करताना येत होती. व्याख्यानं, क्षेत्रभेटी, मानसशास्त्रीय चाचण्यां विषयी माहिती या सर्वांच्या धावपळीत एकवीस दिवसांचा कोर्स सुफळ संपूर्ण झाला. अगदी शेवटी बक्षीस समारंभाच्या दिवशी अहवाल लेखनासाठी माननीय राजश्री केळकर मॅडम यांच्या हस्ते सुंदरसा फुलांचा गुच्छ आणि आशीर्वाद मिळाले.

आता मला वेध लागले होते डिप्लोमा इन व्होकेशनल गाईडन्स पूर्ण करण्याचे. पूर्ण शैक्षणिक वर्ष असलेला हा डिप्लोमा मी शैक्षणिक वर्ष २००३-०४ मध्ये यशस्वीरित्या पूर्ण केला. मानसशास्त्रीय कसोट्या,समुपदेशनाचे वेगवेगळे आयाम, विविध व्यवसायांची माहिती, विद्यार्थी आणि पालक यांच समुपदेशन या सर्वांचा सकारात्मक परिणाम माझ्या व्यक्तिमत्त्वावर झाला. आधीच सकारात्मक असलेलं माझं व्यक्तिमत्त्व अधिक सजग आणि उत्स्फूर्त झालं.

माझं विद्यालय कामगार वस्तीत आहे. पालकांच अज्ञान, गरिबी, अनेक अडचणींनी भरलेलं पालकांचं आणि विद्यार्थ्यांच आयुष्य पण मला या सर्वांतून विद्यार्थी आणि पालकांना समुपदेशन करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांच, पालकांचं वैयक्तिक, सामाजिक, भावनिक आयुष्य जाणून घेता आलं. इयत्ता नववीपासून विविध व्यवसायांची ओळख, विद्यार्थी इयत्ता दहावीत गेले की दिवाळीच्या किंवा नाताळच्या सुट्टीत सर्व विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय कसोट्या देऊन व्यवसाय मार्गदर्शन/समुपदेशन, पालकांच समुपदेशन मी करते. यासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतंही शुल्क आकारले जात नाही. विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय कसोट्या देऊन त्यांच्या बुद्धिमत्तेची, अभियोग्यतांची, अभिरुची, समायोजन क्षमतेची जाणीव करून दिली जाते. पुढे कोणता अभ्यासक्रम निवडावा, समायोजन कसं साधावं, ताणतणावर मात कशी करावी समाजात वागताना कसं वागावं, देशासाठी आपली कर्तव्ये काय याची कल्पना दिली जाते.

काही वेळा इतर शाळांतील माझे सहकारी समुपदेशक माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना समुपदेशन/व्यवसाय मार्गदर्शन बोलावते. विद्यार्थ्यांचा समुपदेशकां बरोबर संवाद घडवून आणते जेणे करून माझ्या विद्यालयातील विद्यार्थी सर्वांग परिपूर्ण व्हावा. जगाची द्वारं ज्ञानाच्या मार्फत उघडली जावीत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव मिळावा यासाठी क्षेत्रभेटीचे आयोजनही करण्यात येते. कोरा केंद्र, बोरिवली (पश्चिम), युसुफ मेहेर अली सेंटर तारागाव, पनवेल अस्मिता संस्था संचालित चोगले अस्थिव्यंग चिकित्सा केंद्र बोरीवली पूर्व येथे क्षेत्रभेटी देऊन विविध व्यवसायांची, स्वयं रोजगारांची ओळख करून दिली जाते.

रोजच्या वर्तमानपत्रात व्यवसाय मार्गदर्शन/समुपदेशन यावर आधारित लेख येतात. त्यांच संकलन करून ठेवले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांची माहिती एकत्र मिळते. यावर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांना दिले जातात. विद्यार्थांना जो अभ्यासक्रम निवडायचा आहे, ज्या व्यवसायात करियर करायचे आहे

त्या व्यवसायाची माहिती माझ्या संकलनातून तसेच इंटरनेटवरुन संकलित करून लिहायला सांगते. विद्यार्थांना ज्या विषयात करिअर करायचे आहे ती माहिती विद्यार्थ्यांकडे दहावीत उत्तीर्ण होईपर्यंत जमा होते.

कोरोना १९ च्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद पण शिक्षण सुरू होतं. महाराष्ट्र शासनाने ४२६ समुपदेशकांच्या नावांची यादी मिडियावर जाहीर केली आणि अगदी नाशिक, नागपूरपासून ते छोट्या छोट्या गावांमधूनही फोन यायला लागले. या विद्यार्थ्यांचं ऑनलाइन समुपदेशन केलं. विद्यार्थ्यांना जाणवणारा ताणतणाव, असुरक्षितता, मानवी भावभावनांचा विद्यार्थी दशेतला गोंधळ, अनिश्चितता अनुभवली. विद्यार्थी तसेच पालक यांचही समुपदेशन केलं. मला याचा सार्थ अभिमान वाटतो की मी समुपदेशनाच्या प्रक्रियेत मनापासून सहभागी झाले. माझा खारीचा वाटा मी उचलला.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई आयोजित 'व्यावसायिक वाटा, प्रगतीच्या दिशा हा. कार्यक्रम दर गुरुवारी सकाळी दहा वाजता प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई या यूट्यूब चॅनेलवरून प्रक्षेपित करण्यात येतो. विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांची ओळख व्हावी यासाठी व्यावसायिकांशी ऑनलाइन संवाद साधला जातो हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे. मुलाखतकार म्हणून नर्स, यंत्र अभियांत्रिकी, स्वयंरोजगार करणाऱ्या दिव्यांग व्यक्ती, फिटनेस ट्रेनर,सैन्यदलातील मेजर, डॉक्टर, सुलेखनकार, व्याख्याता ,वास्तूविशारद यांच्या मुलाखती मी घेतल्या. व्यावसायिकांचे विविध अनुभव ऐकायला मिळाले. विद्यार्थी, पालक, शिक्षक याच्या करिता हे अनुभव नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहेत.

Sky is the Limit असं म्हणतात २००४ ते आज २०२१ या कालावधीत सतरा वर्षांत अनेकविध पद्धतीने समृद्ध होत गेले याचं श्रेय समुपदेशनाला जातं.

**अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला.** असं कुसुमाग्रज आपल्या काव्यात म्हणतात. समुपदेशनामुळे ही ध्येयासक्ती वाढत गेली. मी आतून समृद्ध होत गेले. माझा आंतरिक आनंद मला समुपदेशनातून मिळाला.

---

"अनेक वेळा माहिती आणि ज्ञान यांच्यामध्ये गल्लत होते. माहितीलाच आपण ज्ञान समजून जातो. फळ आहे म्हणजे वृक्ष असणार पण वृक्ष आहेत म्हणजे त्याला फळं लागतीलच असे होत नाही. जेव्हा आपण प्राप्त माहितीच्या आधारे आपण काही सामानीकरणे मिळवू शकतो तेव्हा फलधारणा झाली असे म्हणायला हरकत नाही. माहितीवर विश्लेषण करणे, तुलना करणे, साम्य - भेद ओळखणे, उपयोजन करता येणे यासारख्या प्रक्रिया केल्या की आपल्याला ज्ञान रुपी फळ प्राप्त होते. माहितीवर काही प्रक्रिया करणे गरजेचे असते. केवळ जे दिसते आहे, ऐकु येते आहे म्हणजे ज्ञान नव्हे. माहिती संपादन करून फळ येण्याची अपेक्षा मात्र जरूर धरायला हवी."

डॉ. उमेश प्रधान



पी एम काळे,
राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक (निवृत्त)
फलटण, जिल्हा सातारा
9823257066

## सावध ऐका त्यांच्या हाका

विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संभाषण. 'सर. मला एका मार्काने दगा दिला. मला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही'. विद्यार्थी बोलत होता. नैराश्य व सर्व काही गमावल्याची भावना व दुःख शिक्षकांना समजत होते. प्राप्त परिस्थितीमध्ये रडत बसण्यात काहीच उपयोग होणार नव्हता. शिक्षक सर्वतोपरी त्याची समजूत काढत होते. त्यांच्या समजावण्यातील एक वाक्य जादू करून गेले. हे वाक्य होते 'हे बघ मित्रा, तुला आता डॉक्टर होता येणार नसले तरी काही हरकत नाही. तू कलेक्टर होऊ शकतोस 'If you can't be a doctor you can be a collector.' भले बुरे विसरून त्या विद्यार्थ्याने पुढील प्रवास सुरू केला. तो पदवीधर झाला व स्पर्धा परीक्षेत चमक दाखवून सरकारी नोकरीत रुजू झाला. आज तो विद्यार्थी पुणे येथे एका उच्च पदावर कार्यरत आहे.

येथे एक गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी. तो शिक्षक काही प्रशिक्षित समुपदेशक नव्हता. त्याला या क्षेत्रातील अनुभव सुद्धा नव्हता तरीही आपल्या एका विद्यार्थ्याला नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी, त्याला उभारी देण्यासाठी,योग्य सल्ला देण्याचे काम केले आणि त्यामध्ये तो यशस्वी सुद्धा झाला. थोडक्यात काय तर शिक्षकाला शिकविण्याबरोबरच इतर अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यातीलच समुपदेशक व समुपदेशन ही एक महत्त्वाची भूमिका आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांमध्ये भर घालतात ती त्यांच्यातील शारीरिक, मानसिक व भावनिक बदलातून उठणारी वादळे, त्यात पालक समस्याग्रस्त व घटस्फोटीत असतील, आर्थिक परिस्थिती हलाखीची असेल तर मग बघायलाच नको. एकीकडे अभ्यासात इतरांबरोबर राहणे व दुसरीकडे अशा समस्यांना पूरून उरणे अशी तारेवरची कसरत त्यांना करावी लागते.

अशा वेळी शिक्षकांनी त्यांच्या हातातील ती लांब काठी बनायला हवी. तीच त्यांना तोल सांभाळत पुढे जाण्यास मदत करत असते हे आपण डोंबाऱ्याच्या खेळात पाहिले आहेच. समुपदेशकांनी प्रथम त्यांच्या मनातील आंदोलने, वादळे स्थिर करायला हवीत. नंतर त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. त्यांचे परिशीलन करावे. साधक-बाधक विचार मंथनातून वर आलेले उपाय तयार ठेवावेत. त्यांचा पालक, मित्र, मार्गदर्शक, साथीदार तथा सवंगडी बनून विश्वास संपादन करावा. एवढे केल्यानंतर मग आपण त्याला समुपदेशन करू शकता कारण जग हे विश्वासावर उभं आहे याची आपणाला कल्पना आहे. मात्र हे करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करावी लागते. आपल्याला माहित आहे की हरळीला सुद्धा धुमारे फुटतात पण त्यासाठी आवश्यक असते ती अनुकूल परिस्थिती !!



अविनाश कुलकर्णी,
विद्या भवन हायस्कूल, नेरूळ, नवी मुंबई
मोबाइल: 9867784408

# हवे नियोजन यशाचे

आपल्या आवडत्या गोष्टी आपल्याला आयुष्यभर करायला मिळाले, त्यातून पुरेसे अर्थार्जनही झाले आणि त्यातून आपले स्वप्न पूर्ण करता आले तर आपण आपल्या जीवनात यशस्वी झालो आहोत असे म्हणता येईल. जीवनात असे यश क्वचितच नशिबाने मिळते, परंतु नियोजनबद्ध प्रयत्न करून यश संपादन करणे नक्कीच शक्य असते. क्षेत्र कोणतेही असो अपघाताने किंवा अचानक यशस्वी झालेल्यांचे प्रमाण अगदीच नगण्य असते. सर्व विकल्पांचा विचार करून इच्छित कामाचे उपलब्ध वेळेनुसार केलेले योग्य नियोजन आणि त्याची अंमलबजावणी वेळेत आपले ध्येय गाठण्यास उपयुक्त ठरते.

**ध्येय निश्चिती:** परफेक्ट नियोजन करण्याअगोदर जे  मिळवायचे आहे ते ध्येय निश्चित केले पाहिजे. एखादी पदवी मिळवणे, नोकरी मिळवणे, व्यवसायातील उच्चांक गाठणे, एखादे मोठे कार्य पूर्ण करणे अशी ध्येय असू शकतात. निश्चित केलेलेच ध्येय का पूर्ण करायचे आहे याची कारणमीमांसा कागदावर उतरवली तर उत्तमच.  आपली आवड, क्षमता, त्यासाठी लागणारा वेळ, उपयुक्त होऊ शकतील अशा उपलब्ध गोष्टी यांचा ध्येय निश्चित करताना विचार व्हायलाच हवा.

**चाचण्या:** आवड आणि क्षमता काही मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे तपासता येतात. व्यवसाय मार्गदर्शन करणाऱ्या काही संस्था आणि काही अधिकृत तज्ञ मंडळी या शास्त्रीय चाचण्या वैयक्तिक स्तरावर घेतात. यात बुध्यांक (आय.क्यू.-इंटेलिजन्स कोशंट), भावनिक गुणांक (ई.क्यू.-इमोशनल कोशंट), सामाजिक गुणांक (एस.क्यू.- सोशल/स्पिरीच्युअल कोशंट), सृजनशीलता गुणांक(सी.क्यू.- क्रिएटीव्हिटी कोशंट) आणि अलीकडेच नव्याने घेतला जाणारा संयोग गुणांक (ए.क्यू.- अॅडॅप्ट्यालिटी कोशंट) या चाचण्या असतात. ऑनलाइन देखील यातील काही चाचण्या मोफत उपलब्ध असतात, परंतु उमेदवाराने चाचण्या देताना दाखवलेला प्रामाणिकपणा अचूक निष्कर्ष मिळण्यासाठी खूप महत्वाचा ठरतो

**भविष्यातील बदलांचा अंदाज:** रोजगाराबाबत आज असलेली परिस्थिती भविष्यात असेलच असे नाही, म्हणून निश्चित करणार असलेल्या ध्येयाची भविष्यातील तुमच्यासाठी असलेली उपयुक्तता किती असेल याचा अंदाज घेऊन ध्येय निश्चित करावे.  मागील काही वर्षांत जगभर झालेले बदल लक्षात घेऊन भविष्यातील बदलांचा अंदाज घेता येवू शकतो आणि हा अंदाज ध्येय निश्चित करण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरतो.

**महत्वाचे टप्पे:** निश्चित केलेले ध्येय साध्य करण्याच्या पायऱ्या असणे आवश्यक आहे. प्रत्येक पायरी ओलांडण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी कराव्या लागतील, कोणकोणत्या अडचणी येवू शकतात, त्यावर कोणते उपाय करणे तुम्हाला शक्य आहे  आणि त्यासाठी किती कालावधी लागेल याची लिखित नोंद करावी. काही वेळा एखाद्या टप्प्यावर नियोजित केलेले काम पूर्ण होत नाही. याची कारणे  तात्कालिक असू शकतात. यासाठी प्रत्येक पायरीवर तुम्ही किती प्रमाणात यशस्वी झाला आहात? याचे देखील मोजमाप करता यावे.

त्या विशिष्ट टप्प्यावर तुम्ही ठरवलेली किती उद्दिष्टे पूर्ण झाली आणि किती अपूर्ण राहिली हे लक्षात घेऊन कार्याचे मोजमाप करता येते. अपूर्ण काम इतर पूर्वनियोजित कार्यास धक्का न लावता किती कालावधीत आणि कसे पूर्ण होऊ शकेल याचा अंदाज घेऊन नोंद ठेवावी

**कार्य समतोल:** एखाद्या किंवा अनेक टप्प्यांवर अनेक कामांचे संतुलन साधावे लागते. त्यातील काही अतिशय महत्वाची आणि काही तुलनेने कमी महत्वाची कार्य तुम्हाला करावी लागतात. जास्त महत्वाच्या कामांकडे जास्त लक्ष्य दिले जाते आणि कमी महत्वाच्या वाटणाऱ्या कामांकडे दुर्लक्ष होते. उदा. अभ्यास करताना वाचन-चिंतन याकडे जास्त लक्ष्य दिले गेले, तर लेखनात अनेक त्रुटी होतील. यासाठी सर्व कौशल्यांचा समतोल साधने महत्वाचे ठरते. यश मिळवण्यासाठी प्रत्येक लहान गोष्ट देखील महत्वाची ठरू शकते म्हणून कार्य समतोल महत्वाचा आहे

**तत्वांची निश्चिती:** काहीतरी मिळवण्यासाठी काहीतरी गमवावे लागू शकते. नक्की काय आणि किती प्रमाणात गमवावे लागू शकते हे प्रत्येकाला स्वतःलाच ठरवायचे असते. अभ्यास करणार असाल तर तडजोड न करता नियमित किती, कोणत्या वेळेत आणि कोणत्या विषयचा कराल? रोजची विश्रांतीची वेळ, झोपेची वेळ, व्यायामाची वेळ, वाचनाची वेळ, चिंतन आणि लेखनाची वेळ, जेवणाची वेळ, नियोजित काम पूर्ण होईपर्यंत आहार कसा असेल आणि कसा नसेल हे सर्व काही तुम्हाला निश्चित करता येवू शकते. यातील प्रत्येकाची काहीतरी करणे आहेत म्हणून तुम्ही स्वतः नियम निश्चित केले असतील तर ती करणे कोणती? हे देखील लक्षात घेतले जावे.

**तडजोड:** नियम किंवा तत्वे ठरवल्यावर अंमलबजावणी होत असताना काही अनपेक्षित गोष्टी घडू शकतात. जसे जवळच्या व्यक्तीचा विवाह, घरातील काही कार्य, जवळच्या नातेवाईकचा मृत्यू, अपघात, किंवा इतर काही आपत्ती तुम्हाला तुम्ही ठरवलेल्या नियम आणि तत्वात तडजोड करण्यास भाग पाडतात. तुम्ही किती प्रमाणात तडजोड करणार आहात? केलेल्या तडजोडीमुळे तुमचे होणारे नुकसान तुम्ही कसे भरून काढाल? याचा एक लवचिक मसुदा जवळ असेल तर अपयश येणे जवळपास अशक्य.

चला तर मग, तुमच्या यशाचे आजच नियोजन करा, अंमलबजावणी करा आणि यशस्वी व्हा. यशस्वी भव !!

शिक्षणाच्या बाबतीत आज जे शिकवले जाइल ते लगेचच आचरणात, कृतीत उतरेल असे होत नाही. अगदी आज दिलेले ज्ञान हे आत्मसात लगेचच आत्मसात होईल असेही नाही. आज जे विचार पेरले आहेत ते रुजायला, मोठे व्हायला, पटायला, समजायला आवश्यक वेळ द्यावाच लागणार. वयोपरत्वे येणारी समज, मेंदूची होणारी वाढ ही काही अचानक होत नसते, त्याला ठराविक वेळ, काळ हा द्यावाच लागतो. आज केले आणि उद्या झाले असे होत नाही. काही बाबतीत सातत्यपुर्ण प्रयत्न करत रहावे लागतात. निसर्गात सुध्दा आज एखादे बी पेरले की लेगेचच त्याला फळे येतील असे होत नाही. निसर्गाचा वेग असा ठरलेला असतो. माणसाने प्रगतीच्या नावाखाली सगळ्याचाच वेग वाढवला आणि निसर्ग नियमाच्या विरुध्द जायला सुरुवात केली. त्यामुळे प्रश्न सोपे होण्या एवजी गुंतागुंतीचेच झाले.

*डॉ. उमेश दे. प्रधान*



जयवंत कुलकर्णी, सहसंपादक
बाल गांधी विद्या मंदिर हायस्कूल कुर्ला
9833209561

# मानसशास्त्रीय चाचण्या: करिअर निवडीतील दिशादर्शक

साधारणतः डिसेंबरपासूनच पालकांची समुपदेशन कुठे मिळविता येईल अशी शोधा शोध सुरु होते. पाल्यांना परीक्षेमध्ये येणाऱ्या अडचणी, गुणवत्तेत क्रमशः येत जाणारे मागासलेपण, विविध कारणांनी नैराश्य आणि मानसिक ढासळलेपण सर्वांनाच ग्रासून टाकते. पुढे करिअर निवडीचा प्रश्न आ वासून उभा राहतो.

दहावी आणि बारावीनंतर पुढील अभ्यासक्रम निवडताना 'हे करू की ते करू' अशी हमखास मनोवस्था विद्यार्थी व पालक अनुभवतात. अशावेळी प्रशिक्षित व अनुभवी करिअर समुपदेशकांच्या मार्गदर्शनाखाली काही मनोवैज्ञानिक चाचण्यांचा आधार घेता येतो. त्यातून विद्यार्थ्यांच्या अभिरुची/ कल, अभियोग्यता (क्षमता) , बुद्धिमत्ता तसेच व्यक्तिमत्त्व विषयक अनेक पैलूंचे मोजमाप करता येते. साधारणपणे आवडीनुसार करिअर करावे असा रूढ संकेत आहे मात्र पौगंडावस्थेतील मुलांच्या आवडी निवडीवर अनेक बाह्य घटकांचा बराच प्रभाव पडलेला जाणवतो. ' नेम अँड फेम' मिळवून देणारे करिअर निवडण्याच्या नादात स्वतःमधील कमी अधिक क्षमता दुर्लक्षित करून चालत नाही. प्रत्येक मुलाची बलस्थाने आणि कमतरता ह्या भिन्न असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक अभ्यासशाखा आणि करिअर मधील आवश्यक गुण कौशल्ये देखील भिन्न असतात. गतिमान बदलांच्या परिस्थितीत अभ्यासक्रम निवडीपूर्वी हा ताळमेळ घालणे गरजेचे ठरते. त्यादृष्टीने या मानसशास्त्रीय चाचण्या करिअर निवडीतील दिशादर्शक ठरतात.

### अभियोग्यता चाचण्यांचे स्वरूप

एकत्रित उल्लेखात अभियोग्यता असे म्हटले असले तरी यात अनेक उपसंच असलेल्या बुद्धिमत्ता, अभियोग्यता, अभिरुची आणि व्यक्तिमत्त्व अशा चार प्रमुख चाचण्या वापरल्या जातात. नावांवरूनच त्यातील वेगळेपणा लक्षात येतो. देश-विदेशात सर्वाधिक प्रमाणात १९४७ साली अमेरिकेतील एम्प्लॉयमेंट ब्यूरोने तयार केलेली सामान्य अभियोग्यता चाचणी संच (GATB) तसेच जी.के. बेनेट हेरॉल्ड, सिशोर अलेक्झांडर आणि वेलमन यांची डिफरंशिअल ॲप्टिट्यूड टेस्ट संच( DAT- B) या चाचण्या भारतीय भाषांत अनुवादित आणि प्रमाणित ( Standardized) करून वापरल्या जातात. GATB या सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या चाचणीतून लेखनिक अभियोग्यता, गणितीय आकडेमोड, अवकाशीय /त्रिमितीय विचार, इंग्रजी शब्द संपत्ती, साधन साधर्म्य, गणितीय तर्क क्षमता, आकार साधर्म्य, अशाब्दिक तर्क, मराठी शब्द संपत्ती या नऊ पेपर पेन्सिल टेस्टस् तर हस्तनेत्र संयोजन क्षमता, बोटांचे चापल्य आणि स्नायूंचे चापल्य या कृती कसोट्याद्वारे क्षमता मापन करता येते.

**अभियोग्यता चाचण्यांचे फायदे**

१) विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतांचा अंदाज घेता येतो. २) योग्य अभ्यासक्रम निवडीसाठी बलस्थाने व उणिवा समजू शकतात. ३) आवड, क्षमता, व्यक्तिमत्त्व आणि बुद्धिमत्ता समजल्याने करिअर क्षेत्र निवडताना सजगपणे निर्णय घेता येतो. ४) विद्यार्थी आणि पालकांचे श्रम, वेळ, पैसा आणि बौद्धिक गुंतवणूक यांचा अपव्यय टळतो. ५) निवडलेल्या अभ्यासक्रम किंवा करिअरमध्ये समायोजन व समाधान लाभते. ६) समुपदेशनातून विद्यार्थी आणि पालक यांच्यात परस्पर अपेक्षा लादल्या जाण्यातून होणारा अनर्थ टळू शकतो.

**अभियोग्यता चाचण्या :- कधी, कशा आणि कुठे ?**

- दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षेनंतर अभियोग्यता चाचण्या हितावह ठरतात.
- प्रशिक्षित समुपदेशकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष तीन ते चार तास उपस्थितीत, नियंत्रित वातावरणात चाचण्या देणे अभिप्रेत असते.
- चाचणीचे निष्कर्ष हे विद्यार्थ्याने दिलेल्या वस्तुनिष्ठ, प्रामाणिक प्रतिसादावर अवलंबून असतात.
- चाचणीनंतर विद्यार्थी, पालकांचे समुपदेशन होणे आवश्यक असते.
- कोविड १९च्या प्रादुर्भावामुळे राज्यात अनेक निर्बंध लागू आहेत. शहरी आणि ग्रामीण भागात काही खाजगी समुपदेशन केंद्र आहेत. मात्र प्रत्यक्ष अभियोग्यता चाचण्या घेण्यास मर्यादा येत आहेत.
- इंटरनेटवर अनेक ऑनलाइन ॲप्टिट्यूड उपलब्ध असल्या तरी त्यावरून करिअर निवडीचे निष्कर्ष काढणे धाडसाचे ठरू शकते.
- शालेय शिक्षण विभागाने www.maa.ac.in या वेबसाईटवर जिल्हानिहाय ४२६ प्रशिक्षित समुपदेशकांची माहिती व मोफत कसोटी विरहित मार्गदर्शन सेवा उपलब्ध करून दिली आहे.

कोविड १९ निर्बंध लक्षात घेऊन एससीईआरटी पुणे यांच्या https://youtu.be/aJ8pIGceTPU या युट्यूब वाहिनीद्वारे विविध विषयांवर तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्यानमाला उपलब्ध करून दिली आहे.





विश्राम सूर्यवंशी
यु. इं. स्कूल,चिपळूण
9881975590

## करिअर निवड प्रक्रियेत मानसशास्त्रीय चाचणी व समुपदेशनाचे महत्व

**प्रस्तावना -**

२१ व्या शतकामध्ये शिक्षणाने तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञानाने उत्तुंग अशी प्रगती केली आहे. मोठमोठाली व नावाजलेली शैक्षणिक संकुल विद्यार्थ्याला खुणाऊ लागले आहेत. शिक्षणाची द्वारे सर्वांसाठी खुली झालीत परंतू सर्वात मोठी अडचण निर्माण झाली आहे ती म्हणजे, कोणते करिअर ? कसे निवडायचे? या आणि यासारख्या अनेक करिअरशी संबधित प्रश्नामध्ये आजचा विद्यार्थी अडकलेला पहावयास मिळू लागला आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्याच्या करिअरचा गुंता सुटण्याऐवजी तो अधिक अधिक घट्ट होतोय असे दिसू लागले आहे. परिणामी दिवसेंदिवस करियरच्या निवडीच्या गर्तेत अडकलेल्या विद्यार्थ्याला त्याच्या आयुष्यात उत्तम करियरची निवड करण्यासाठी मानसशास्त्रीय चाचण्या व त्याद्वारे केले जाणारे समुपदेशनच एकमेव आणि उत्तम पर्याय आहे.

**करियर निवड म्हणजे काय ?**

करियर हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. शिक्षण प्रक्रियेचा एवढा मोठा प्रपंच फक्त उत्तम करियरची निवड करता यावी यासाठीच केला जातो. त्यासाठी एवढे सारे कष्ट घेतले जातात. सर्वांनाच आपल्या आवडीनुरूप करीयरची निवड करता येतेच असे नाही. काहीवेळा म्हणण्यापेक्षा बऱ्याचवेळा “करायला जातो एक आणि होते एक” अशी करियर बाबत स्थिती निर्माण होताना दिसते. अशा वेळी विद्यार्थ्याला त्या करियर निवडीतून मिळणारा किंबहुना आवश्यक असणारा आनंद मिळतोच असे नाही. फक्त कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत असताना अर्थप्राप्ती व्हावी आणि आर्थिक विवंचना येऊ नयेत याकरिता मग तो प्राप्त करियरशी समायोजन करण्याचा प्रयत्न करत असतो.

वास्तविक करियर निवड म्हणजे आपल्या आवडीनुरूप आपल्या क्षेत्राची निवड करणे व त्या क्षेत्रात १००% योगदानाने सहभागी होऊन स्वतःआनंद घेऊन आपण कार्यरत असलेल्या कार्याचा दर्जा उंचावणे. स्वाभाविक “Right man for Right job” असेल ना तर नक्कीच सगळे काही मनासारखे होताना दिसते. पण फक्त समायोजन म्हणून जुळवून घेण्याचा जेंव्हा प्रयत्न केला जातो तेव्हा बऱ्याच समस्या निर्माण होताना दिसतात. एकदा का समस्या निर्माण होऊ लागल्या की आयुष्य अधिकच गुंतागुंतीच बनत जाते. या गोष्टी आयुष्यात पुढे चालून होऊ नयेत,आपल्याआवडीनुरूप आपल्या इच्छेनुरूप तसेच आपल्या बौद्धिक तसेच शारीरिक क्षमतेला पूर्ण न्याय देता येईल असे करियर निवडणे गरजेचे असते. एकदा का अशा करियरची निवड केली तर आयुष्याला एक छानशी गती यायला लागते. प्रगतीचा आलेख सर्व बाजूंनी उंचावला जाऊ लागतो आणि मग सहज कवी मंगेश पाडगावकर यांच्या ओळी ओठावर रेंगाळू लागतात “या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे”.... इतके छान आयुष्य जगायचं असेल म्हणजेच आपल्या करीयरची निवड आपल्या आवडीनुरूप करायची असेल तर मानसशास्त्रीय चाचण्याचा आधार घेणे हितावह ठरेल.

**मानसशास्त्रीय चाचण्या स्वरूप**

I.V.G.S मुंबई यांनी करियर निवडीसाठी आणि त्या विद्यार्थ्याचा अभ्यास करण्यासाठी काही महत्वपूर्ण अशा मानसशास्त्रीय चाचण्या प्रमाणित केल्या आहेत. एकूण ४ टेस्ट जरी दिल्या तरी त्या विद्यार्थ्याचा बऱ्यापैकी अभ्यास करता येऊन त्या विद्यार्थ्याला समुपदेशन करणे सोईचे होते. या मानसशास्त्रीय चाचण्याबाबत महत्वाचे म्हणजे या चाचण्या कोणताही अभ्यास न करता देता येतात. वर्तमान काळात त्याने दिलेला प्रतिसाद यावरून निघणारा निष्कर्ष त्या विद्यार्थ्याचे भवितव्य ठरवणारा असू शकतो. फक्त गरज आहे त्या विद्यार्थ्याने १००% प्रतिसाद देण्याची.

१) N.V.T.I.-

ही टेस्ट विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता मोजणारी टेस्ट असून ती पूर्णपणे अभाषिक आहे. कोणत्याही प्रकारची भाषा न वापरताही विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता मोजली जाऊ शकते.

२) G.A.T.B-

या टेस्टमधून एखाद्या विद्यार्थ्याने तोंडी मुलाखतीतून नोंदवलेला करियर बाबतचा प्रतिसाद आणि टेस्ट मधून आलेला निष्कर्ष याबाबतचा ताळमेळ घातला जातो. त्याने निवडलेल्या करियरबाबत त्याच्याकडे त्या अभियोग्यता आहेत की नाही याबाबतची माहिती मिळू शकते. पुढे चालून त्या विद्यार्थ्याचे करियर चुकू नये यासाठी ही टेस्ट अत्यंत उपयुक्त आहे.

**३)अभिरुची चाचणी -**

या टेस्ट मधून त्या विध्यार्थ्याचा कल मोजला जातो. अगदी १००% जरी बरोबर नसला तरी १००% चुकत नाही हे मात्र खरे आहे. ९०% विद्यार्थ्याचा रस शोधिका चाचणी वरून आलेला कल आणि त्याने मुलाखतीतून निवडलेले करियर हे मिळते जुळते असू शकते . त्याच्याकडे ज्या- ज्या गोष्टीबाबतची आवड आहे साधारण त्या- त्या क्षेत्राबाबत कमी अधिक प्रमाणात आवड दर्शविली जाते. या टेस्ट मधून आलेल्या निष्कर्षानुसार समुपदेशकाकडून मार्गदर्शन करवून घेतल्यास भविष्यकाळात नक्कीच चांगला फायदा होऊ शकतो.

**४)समायोजन चाचणी -**

ही टेस्ट विद्यार्थ्याची समायोजन क्षमता मोजते. तो विद्यार्थी कुटुंब,आरोग्य,समाज,आणि भावनिकदृष्ट्या कसा आहे ? किंबहुना तो विद्यार्थी या क्षेत्रात कसा आहे ? त्याला अडचण तरी नाही ना ? या बाबतचा स्पष्ट आलेख या चाचणी मधून कळतो.

विद्यार्थ्यांच्या करियरबाबत तसेच बरे-वाईट घडण्यात या चाचणीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. बऱ्याचदा शैक्षणिकदृष्ट्या हुशार असणारी मुले कौटुंबिकदृष्ट्या खूप अस्वस्थ असताना दिसतात . त्याचा कळत-नकळत परिणाम त्याच्या करिअरवर होताना दिसतो. काही विद्यार्थी आरोग्याच्या बाबतीत नाजूक असतात त्याचाही परिणाम त्याच्या करिअरवर होत असतो. काही विद्यार्थ्यांकडे समाजभिमुकता खूप कमी असते,तर काही विद्यार्थी भावनिकदृष्ट्या खूपच गंभीर असतात. अशा विद्यार्थ्यांना वेळीच याबाबतचे समुपदेशन झाले तर पुढे चालून येणारा धोका टळू शकतो.

किमान संकटांची जाणिव करून देऊन त्या विद्यार्थ्यांला व त्यांच्या कुटुंबियांना याबाबत सजगता येऊ शकते. मानसशास्त्रीय चाचण्यांतूनच याबाबतची माहिती समुपदेशनाकरवी पालकांना मिळू शकते आणि पुढे

चालून येणाऱ्या धोक्याबाबत पूर्व काळजी घ्यायला मदत मिळू शकते . मानसशास्त्रीय चाचण्याद्वारे समुपदेशन करणे सद्यस्थितीत काळाची गरज बनली आहे.

**५) करियर आणि चाचण्यांचा सहसंबंध -**

करियर आणि मानसशास्त्रीय चाचण्यांचा अतिशय घनिष्ट सहसंबंध आहे. कारण चाचणी शिवाय करियरची निवड केल्यास ३०% लोक यशस्वी होतात असा मानसशास्त्राचा अहवाल सांगतो. वरती म्हटल्याप्रमाणे मानसशास्त्रीय चाचण्यांशिवाय जर करियरची निवड केली तर ती चुकण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये आनंद मिळेलच असे नाही. कारण एस.एस. सी. नंतर अभ्यासक्रमाची निवड करण्यापूर्वी मानसशास्त्रीय चाचणी करणे आवश्यक असते. ग्रामीण भागात त्या बाबतची सजगता नसल्यामुळे आपले मित्र-मैत्रीणी ज्या अभ्यासक्रमाची निवड करतात त्या अभ्यासक्रमाची निवड विद्यार्थी करतो परंतु आवड ही प्रत्येकाची वेगवेगळी असते आणि अशावेळी आपल्या आवडीनुरूप अभ्यासक्रमाला प्राधान्य देण्याऐवजी मित्राच्या विचारांना प्राधान्य दिले जाते. करियर निवडीच्या पायाभूत मार्गात हीच चूक होताना दिसते. प्राथमिक स्तरावर झालेली चूक भविष्यकाळासाठी मोठा धोका निर्माण करताना दिसते. म्हणून करियर निवडीचा आणि मानसशास्त्रीय चाचण्यांचा सहसंबंध मानला जातो. एस.एस. सी. परीक्षेच्या टप्प्यावर जर मानस शास्त्रीय चाचणी करून घेतली तर अधिकृत समुपदेशक ११ वी साठी किंवा एस.एस. सी. नंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा याबाबत उत्तम मार्गदर्शन करू शकतात. इथे चाचण्यांद्वारे आलेल्या निष्कर्ष आणि प्रत्यक्ष आवडीला प्राधान्य असते. आवड आणि आवडीचा अभ्यासक्रम याची योग्य सांगड बसल्याने अभ्यासक्रमाला गती प्राप्त होते.

**६) मानसशास्त्रीय चाचण्या व समुपदेशन –**

विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत योग्य निर्णय घेऊन उत्तम समुपदेशन करण्यामध्ये मानसशास्त्रीय चाचण्यांचा वाटा अतिशय महत्त्वपूर्ण मानला जातो. मानसशास्त्रीय चाचण्यांमुळे समुपदेशनाला दिशा मिळते. विद्यार्थ्याला योग्य आणि आवश्यक ते समुपदेशन वेळीच झाल्यामुळे वेळ आणि समाज यांची सांगड नीट घालण्यात मदत होऊ शकते. मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता आणि योग्यता यामध्ये गती,अवकाशीय क्षमता, भाषिक क्षमता, अचूकता कल आणि कौटुंबिक ते भावनिक समायोजन याबाबत त्याने दिलेल्या प्रतिसादानुसार आलेला निकाल यामुळे त्याचे बलस्थाने आणि कमजोर स्थाने समजतात. परिणामी समुपदेशन करायला मदत होते व विद्यार्थ्याला चांगली दिशा मिळू शकते. समुपदेशनात विद्यार्थी व पालकांना समुपदेशन केल्यामुळे कौटुंबिक वातावरणातील अस्थिरता कमी होण्यास मदत होऊन विद्यार्थ्याला चांगला फायदा होतो. काही वेळा विद्यार्थ्याच्या करियर निवडीत पालकांचे आडमुठे धोरणही कारणीभूत ठरत असते तेव्हा समुपदेशनामुळे पालकांना त्यांची भूमिका समजण्यास मदत होते. मला जे करता आले नाही ते माझ्या मुलाने करायला हवे अशा विचाराचे काही पालक पहावयास मिळतात. अशा पालकांना समुपदेशनातून आवड ही व्यक्तीनुसार कशी बदलते ,एखादा अभ्यासक्रम सक्तीने जर त्या मुलांवर लादला तर त्याचे गंभीर परिणाम काय होऊ शकतात हे समुपदेशक निःस्पृह वृत्तीने त्यांना सांगतो. यामागे त्या विद्यार्थ्याचे चांगले व्हावे, त्यांच्या आवडीनुरूप अभ्यासक्रम निवडायला त्याला मदत व्हावी, कौटुंबिक समस्या असतील तर दूर व्हाव्यात हाच त्यामागे शुध्द हेतू असतो.

**७) करियरची निवड -**

करियरची निवड करण्याचा सर्वाधिकार हा त्या विद्यार्थ्याला असतो. मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे त्याला त्याची आवड, क्षमता, चांगले गुण,उणिवा याबाबत समुपदेशक मार्गदर्शन करतात तेव्हा वेळीच आपल्यातले

चांगले आणि वाईट गुण समजल्यामुळे विद्यार्थ्याला योग्य निर्णय घ्यायला मदत होते. हे त्याच्या भवितव्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरते. मानसशास्त्रीय चाचण्या विद्यार्थ्यांच्या करियर निवडीत अतिशय महत्वाची भूमिका बजावत असतात. आपली बुद्धिमत्ता, शारीरिक क्षमता, स्वभाव वैशिष्ट्ये, परिस्थिती,अभियोग्यता या सर्वांचा सर्वसमावेशक आणि उपयुक्त विचार करूनच विद्यार्थ्याने करियर निवड करणे सोयीचे ठरते. यावेळी महत्वाचा आधार किंवा सहाय्यभूत घटक म्हणून मानसशास्त्रीय चाचण्यांना प्राधान्य दिले जाते. वयाच्या किमान ६० वर्षापर्यंत जेव्हा एखाद्या करियर मध्ये आपल्याला काम करायचे असते तेव्हा ते आपल्या आवडीचे आणि आनंद देणारे असावेत. योग्य व्यक्तीच योग्य करियरला न्याय देऊ शकते. अन्यथा हा प्रवास अतिशय कंटाळवाणा, निरसवाणा होतो. परिणामी त्यातून मिळणारे निष्कर्ष देखील दर्जा हीन असतात.

समायोजन म्हणून निवडलेले करियर समाधान देऊ शकत नाही. त्याच बरोबर केवळ अर्थप्राप्ती हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन निवडलेले करियर पैसा मिळवून देते पण आयुष्यभराचा आनंद हिरावून घेते. कामाचा आनंद मिळाल्यास कामात शीणता येत नाही व काम करायला उत्साह वाटू लागतो. म्हणून करियरची निवड करताना सर्व प्रथम आपली आवड आणि त्या बाबत असणारे ज्ञान तसेच शारीरिक क्षमता याचा विचार करणे अतिशय गरजेचे आहे.

**८) मार्गदर्शन एक उपयुक्त शास्त्र-**

वरील सर्व गुंतागुंतीत मार्गदर्शन हे एक उपयुक्त शास्त्र आहे. परंतु हेच मार्गदर्शन मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे घेतल्यास त्याला एक चांगली दिशा मिळू शकते आणि प्रत्येक वेळी स्वतंत्र प्रयोगशाळा न करता योग्य मार्गदर्शन मिळायला मदत होते. मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्याला आत्मविश्वास वाटू लागतो. नवीन काहीतरी करून दाखवू याबाबत विश्वास वाटू लागतो. वेळीच उणीवा आणि वेळीच चांगले गुण समजल्यामुळे आवश्यक त्या गुणात वाढ व अनावश्यक गुण काढून टाकायला मदत होते. व्यक्तिमत्वात बदल करण्यास मदत मिळते. विघातकतेकडून विधायकतेकडे जाण्यास मार्गदर्शन खूपच मौलिक ठरते. योग्य वयात योग्य मार्गदर्शन भविष्यकाळात येणाऱ्या विविध समस्यांवर मात करण्याचे किंबहुना त्याला समर्थपणे प्रतिकार करण्याची शक्ती निर्माण करणारे उपयुक्त शस्त्र आहे. मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आधारे केले जाणारे मार्गदर्शन खूप उपयोगी, खूप खोलवर आणि दूरगामी परिणामकारक ठरू शकतो.

**९) कार्याचा आनंद सफल आयुष्याची नांदी -**

उत्तम मार्गदर्शन मिळाल्यामुळे विद्यार्थी आपल्या करियरमध्ये मनापासून सहभागी होतो. परिणामी त्याला हळूहळू कार्यपूर्तीचा आनंद मिळू लागतो. हीच त्यांच्या सफल आयुष्याची नांदी असते. सफल आणि आनंदी आयुष्य हेच जीवनाचे अंतिम ध्येय असते. यासाठी गरज असते उत्तम मार्गदर्शकाची. एकदा का कार्याचा आनंद मिळू लागला की जीवन सुद्धा कमी वाटू लागते. आयुष्य अतिशय सुखद होऊ लागते. प्रत्येक व्यक्तीचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा साधारण असाच असतो. आयुष्यात मार्गदर्शकाची भूमिका अतिशय महत्वाची मानली जाते. दुर्योधनाला शकुनी मामा मार्गदर्शक मिळाला आणि त्याच्या आयुष्याची माती झाली तर अर्जुनाला श्रीकृष्ण मार्गदर्शक मिळाल्यामुळे त्याच्या आयुष्याचे सोने झाले. म्हणून उत्तम मार्गदर्शनाने आपण आपल्या कार्यात मनापासून सहभागी व्हायला लागतो. इथेच सफल आणि समृद्ध जीवनाची नांदी सुरु होते.

शेवटी करियर निवड प्रक्रिया ही आयुष्यातील अतिशय महत्त्वाची घटना आहे. करियर हा आपल्या किंबहुना प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग असतो. त्याची निवड एकदा नीट आणि आवडीनुरूप झाल्यास

पुढील आयुष्याचा प्रवास अतिशय सुखकर होतो. फक्त हे सुखकर आयुष्य बनवण्यासाठी वेळीच मानसशास्त्रीय चाचणीच्या आधारे आपला करियर निवडीचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. एकूणच वरील सर्व गोष्टींचा विचार करता करियर निवडीत मानसशास्त्रीय चाचणीचा आधार घेणे आवश्यक आहे. समुपदेशनाच्या सहाय्याने आपले आयुष्य आपणच घडवू शकतो कारण शेवटी <u>आपणच आपल्या आयुष्याचे शिल्पकार आहोत</u> हे विसरून चालणार नाही.






संकलक
पी. एस. गुरव, (शिक्षक समुपदेशक)
गांधी एज्युकेशन सोसायटी, कुंडलचे शहीद सुरेश चव्हाण हायस्कूल, करोली(टी)
ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.
9673469031

## समुपदेशकांची कर्तव्ये

- शाळेत व्यवसाय मार्गदर्शन कक्ष सुरु करणे.
- शालांतपूर्व इयत्तांमध्ये समुह मार्गदर्शन व किमान इ. १० वी, १२ वी च्या ४० विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय कसोटयांचे आयोजन करुन लाभार्थीसह संबंधित कार्यालयास अहवाल पाठविणे.
- विद्यार्थी व पालकांना मानसशास्त्रीय कसोटयांवर आधारित समुपदेशन करणे त्याचप्रमाणे कसोटी विरहित तंत्रांचा अवलंब करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
- इ. ९ वी व १० वी साठी व्यवसाय मार्गदर्शन हा विषय वैकल्पिक विषय म्हणून सुरु करावा.
- इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक निवड, विविध उपलब्ध व्यावसायिक संधी, व्यवसाय निवडीवर परिणाम करणारे घटक, चांगल्या अभ्यास सवयी, व्यवसाय मार्गदर्शन, इत्यादी विषयांवर व्याख्याने देणे.
- विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारचे प्रगती अभिलेख पालकांकडे पाठविणे.
- समस्याप्रधान विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यास मदत करणे.
- शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांना प्रासंगिक मार्गदर्शन व समुपदेशन करणे.
- व्यवसाय मार्गदर्शन परिषदांचे आयोजन करणे व संबंधित कार्यालयास लाभार्थीसह अहवाल पाठविणे.
- व्यवसाय मार्गदर्शन दिन, व्याख्याने, शिबीरे, प्रदर्शने आयोजित करणे व संबंधित कार्यालयांना लाभार्थीसह अहवाल पाठविणे.
- दर दोन ते चार वर्षांनी इ. १० वी साठी स्थानिक पातळीवर मानके तयार करणे.
- विभागीय/जिल्हा पातळीवर ज्या ज्या वेळी समुपदेशकांच्या सेवांची आवश्यकता असेल त्या त्या वेळी त्या उपलब्ध करुन देणे.

**(टीप : या सेवांसाठी समुपदेशकांना कार्यमुक्त करणे संस्था चालकांवर व शाळांवर बंधनकारक राहील.)**

## Business




**We provide Result Oriented Teachers for all Subjects from Std I to XII**

***Please note:***
***This facility is available only in Mumbai, Thane City, Mira Road, Bhayandar, Vasai and Virar.***
***Contact: +91 89280 44075***
smartcoaching2112@gmail.com

## Business

